नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५७ Issue - 57 | वार सोमवार दि. १४ जुलै २०२५ Blow- Monday Date 14 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

### फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या वतीने जनमेजय भोसले यांचा नागरी सत्कारचे प्रमुख पाहुणे

# प्रवीण गायकवाड यांच्यावर कार्यक्रम ठिकाणी येत असताना अंगावर शाहीफेक करून गोंधळ घालण्याचा प्रयत्न

## वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे भेट घेऊन कार्यवाहीचे केले मागणी








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अन्नदान करतानाच पुरग्रस्त, भुंकपग्रस्तांना मदत करताना जनमेजय भोसले यांची सहवेदना जाणवली. ज्याला संवेदना असते तो माणुसकीचे असतो. दररोज ३०० निराधारांना समर्थ प्रसादाच्या माध्यमातून घरपोच जेवण पोहोचविणारा तुम्ही माणसातील संत आहात. यामुळे हा सत्कार केला जात आहे असे मनोगत शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांनी केले.

श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था,अक्कलकोट व सकल मराठा समाज, अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजय भोसले यांचा नागरी सत्कार व मानपत्र प्रदान समारंभ उत्साहात पार पडला. रविवारी १३ जुलै रोजी दुपारी अक्कलकोट येथील प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन येथे हा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्जेराव जाधव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ड.शरदराव फुटाणे हे होते.

**पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस कर्मचारी चिदानंद उपाध्ये हे देवस्थान येथील गर्दी नियोजन करून घरी जात होते. अचानक ही घटना कळताच तात्काळ येथे पोहोचुन गर्दीवर नियंत्रण मिळविले. त्यांच्या समयसुचकतेमुळे पुढिल अनर्थ टळला.**

येथील कमलाराजे चौक, अक्कलकोट येथे १३ जुलै २०२५ रोजी दुपारी १ वा.चे सुमारास फत्तेसिंह संस्थेच्या कार्यक्रमास संभाजी ब्रिगेड सामाजिक संस्था पुणे प्रदेश अध्यक्ष प्रविण गायकवाड व कार्यकर्ते गाडीतून उतरुन हॉलकडे पायी चालत जात असताना संभाजी ब्रिगेड सामाजिक संस्था या नावाच्या पुढे श्री छत्रपती हे नाव लावावे या कारणावरुन शिवधर्म फाउंडेशनचे अध्यक्ष दिपक काटे, (रा. इंदापूर, जि.पुणे) व कार्यकर्ते यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन प्रविण गायकवाड व फिर्यादीचे अंगावर शाई वंगण टाकुन श्री छत्रपती संभाजी महाराज की जय अशा मोठमोठ्याने घोषणा देवून सर्वांना धक्काबुक्की करुन हाताने मारहाण केली तसेच इनोव्हा गाडीच्या समोरच्या काचेवर दाड मारून नुकसान केल्याची घटना घडली.





संशयित आरोपी दिपक काटे, किरण साळुंखे, (रा. भवानी नगर, इंदापुर,) भैय्या ढाणे (रा. भवानी नगर, इंदापुर, ) कृष्णा क्षिरसागर, (रा. कसबा बारामती, जि.पुणे), अक्षय चव्हाण, (रा. तांदुळवाडी बारामती,जि.पुणे), बाबु बिहारी (रा.तांदुळवाडी बारामती), भवानेश्वर बबन (शिरगिरे रा. इंदापुर, जि.पुणे) यांच्या वर अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे मध्ये गुन्हा दाखल झाला. उत्तर पोलीस ठाणेस गु.र.नं. ३६५/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२),१८९(२),१९१(२),१९०, ३२४(४) प्रमाणे दाखल झाले. फिर्याद संभाजी दशरथ भोसले, (वय ४० वर्षे), व्यवसाय- शेती. (संभाजी ब्रिगेड सामाजिक संस्था सोलापुर जिल्हा अध्यक्ष) रा.कोंडी, ता. उत्तर सोलापुर, यांनी दिली.यामध्ये इनोव्हा कारचे पुढील काच फुटुन नुकसान झाले. याबाबत पोलीस सुत्राकडुन मिळालेली अधिक माहिती अशी की, १३/७/२०२५ रोजी दुपारी १ वा. चे सुमारास कमलाराजे चौक येथील प्रियदर्शनी हॉल येथे श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था अक्कलकोट व सकल मराठा समाज अक्कलकोट यांचे संयुक्त विद्यमानाने कार्यक्रम आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरीता यातील फिर्यादी सोबत संभाजी ब्रिगेड सामाजिक संस्था पुणे प्रदेश अध्यक्ष प्रविण गायकवाड व कार्यकर्ते गाडीतून उतरुन हॉलकडे पायी चालत जात असताना संभाजी ब्रिगेड सामाजिक संस्था या नावाच्या पुढे श्री छत्रपती हे नाव लावावे या कारणावरुन शिवधर्म फाउंडेशनचे अध्यक्ष दिपक काटे, रा.इंदापूर, जि.पुणे व कार्यकर्ते , किरण साळुंखे रा. भवानी नगर, इंदापुर, जि. पुणे, भैय्या ढाणे रा. भवानी नगर, इंदापुर, जि.पुणे, कृष्णा क्षिरसागर रा. कसबा बारामती,जि.पुणे, अक्षय चव्हाण रा. तांदुळवाडी,बारामती, जि.पुणे, बाबु बिहारी रा. तांदूळवाडी, ता.बारामती,जि.पुणे, भवानेश्वर बबन शिरगिरे रा. इंदापुर, जि.पुणे यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन प्रविण गायकवाड व फिर्यादीचे अंगावर शाई वंगण टाकुन श्री छत्रपती संभाजी महाराज की जय अशा मोठमोठ्याने घोषणा देवून सर्वांना धक्काबुक्की करुन हाताने मारहाण केली तसेच इनोव्हा गाडीच्या समोरच्या काचेवर दगड मारून नुकसान केले.

अधिक तपास सपोनि निलेश बागाव हे करीत आहेत.

**प्रवीण गायकवाड फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने अक्कलकोट येथे आले होते. कार्यक्रम स्थळी स्वागत होतानाच शिवधर्म फाऊंडेशनचे काही पदाधिकारी व शिवभक्त यांनी छत्रपती संभाजी महाराजाबद्दल एकेरी उल्लेख करतो असे म्हणत श्री छत्रपती सभाजी बिग्रेड असे नामकरण करावे असे म्हणत शाई फासण्यात आले. तसेच मारहाणही करण्यात आली. हा प्रकार घडल्यावर ते आपल्या कारमध्ये जाऊन बसले होते. कार्यकर्ते आक्रमक झाले व कारमध्ये घुसुन बाहेर काढुन मारहाण केली.**

**संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर आज अक्कलकोट येथे भ्याड हल्ला झाला त्यांच्यावर शाहीफेक करून मारहाण करण्यात आली याचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर निषेध करून संभाजी ब्रिगेडचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष संभाजी भोसले शहराध्यक्ष जगदाळे आणि अक्कलकोटचे बाळासाहेब मोरे यांच्या समवेत अक्कलकोट विभागाचे डी वाय एस पी यामावार , पोलीस निरीक्षक टाकणे यांची भेट घेऊन सदर घटने मध्ये सहभागी असलेले आरोपी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या आरोपींना तत्काळ अटक करावी आणि कडक कार्यवाही त्यांच्यावर करावी आधी मागणीसाठी उत्तर पोलीस स्टेशन येथे वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे अक्कलकोट शहराध्यक्ष विशाल ठोंबरे शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले विद्यार्थी संघटनेचे प्रवक्ते रवी पोटे उपस्थित होते.**

---

### मंत्री दत्तात्रय भरणे यांचे वक्तव्य

### छगन भुजबळांनी केली पाठराखण

# लाडकी बहीण योजनेमुळे निधीला थोडा उशीर झाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे / नाशिक : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी महत्त्वाची ठरली आहे. लाडकी बहीण योजनेच्या १२ हप्त्यांची रक्कम लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. जून महिन्याच्या हप्त्याची रक्कम काहीच दिवसांपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागातून यापूर्वी निधी वर्ग करण्यात आल्यानं वाद निर्माण झाला होता. आता महायुती सरकारमधील मंत्री दत्तात्रय भरणे यांनी लाडकी बहीण योजनेमुळं निधी यायला उशीर होतोय, असं म्हटलं आहे. दुसरे मंत्री छगन भुजबळ यांनी देखील दत्तात्रय भरणे यांनी वक्तव्य केलं त्यात लपवण्यासारखं काय आहे, असं म्हटलं. उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी दत्तात्रय भरणे यांच्या अपेक्षा काय आहेत, याची माहिती घेणार असल्याचं म्हटलं.



दत्तात्रय भरणे यांनी काल एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं की, मी इंदापूर तालुक्याल सर्व विभागातून जास्त निधी आणण्याचा प्रयत्न करत असतो. आज लाडक्या बहिणीमुळे निधी यायला थोडा उशीर होतोय. थोडा उशीर झाला पण गाडी हळूहळू पूर्ववत यायला लागली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना दत्तात्रय भरणे यांच्या वक्तव्यासंदर्भात विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना छगन भुजबळ यांनी यात लपवण्यासारखे काही नाही, स्वाभाविक आहे. घरी अचानक एक मोठा खर्च निघाला तर काय स्थिती होते. लाडकी बहीण योजनेसाठी ४५००० कोटी बाजूला काढायचे आहेत. त्यामुळे इतर गोष्टींना ताण सहन करावा लागेल. शंभर टक्के मलाही वाटते आणि कोणालाही वाटणार,असंही छगन भुजबळ म्हणाले. सरकारकडे लाडक्या बहिणींसाठी शिल्लक निधी पडलेला नव्हता. जोपर्यंत नीट घडी बसत नाही तोपर्यंत हे होणार आहे. सरकार पुन्हा पूर्ववत घडी कशी बसणार यासाठी प्रयत्न करत आहे. लाडकी बहीण, शिव भोजन थाळी याच्या पैशांना देखील उशीर होत आहे. पैसे कुठेही जाणार नाही सर्वांना ते पैसे मिळणार आहेत. पहिले कशाला प्राधान्य द्यायचं हे सरकारने ठरवायचे असते, असं छगन भुजबळ म्हणाले.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी देखील दत्तात्रय भरणे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार यांनी मी विचारतो त्याला, त्याच्याकडे कुठली बातमी कळाली, शेवटी तो माझा सहकारी आहे. मंत्री महोदय आहेत, त्यांना विचारुन क्लिअर करतो, कुठल्या अपेक्षेनं, कुठल्या हेतूनं ते बोलले आहेत, असं म्हटलं.

# एकनाथ शिंदेंचे ४ नेते अडचणीत येणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी राज-उद्धव ठाकरे यांच्या एकत्रिकरणावर, महापालिका निवडणुका आणि मुंबईतून मराठी माणूस हद्दपार केला जात असल्याच्या मुद्द्यांवर भाष्य केलं. महानगरपालिका निवडणुका अजून जाहीर झालेल्या नाहीत, त्या जाहीर होऊद्या. लोकांची इच्छा आहे, लोकांच्या भावना आहेत.

स्वत: राज ठाकरे यांनी व्यासपीठावरुन सांगितलंय, की बाळासाहेब ठाकरेंचं स्वप्न साकार करू. तसंच उद्धव ठाकरेही म्हणाले आहेत, की लोकांच्या, महाराष्ट्राच्या मनात जे आहे ते होईल. राज आणि उद्धव यांनी एकत्र यावं हा लोकांचा रेटा आहे. फार चर्चा न करता आपण त्या गोष्टीला वेळ द्यायला हवा, योग्य वेळी योग्य निर्णय होत असतात, असं म्हणत शिवसेना खासदार संजय राऊत यांनी राज आणि उद्धव ठाकरेंच्या एकत्रिकरणावर भाष्य केलं.

सत्ताधाऱ्यांचं डोकं ठिकाणावर आहे का? मुंबईचं दिल्लीच्या वाटेवरचं पायपुसणं केलं आहे. ही मुंबई मराठी माणसाची आहे. धारावीच्या पुनर्वसनावर बोला. धारावीच्या निमित्ताने अदानींना भूखंडाने आंघोळ घातली जाते, त्यावर बोला. मुंबईतल्या मराठी माणसाला हद्दपार केलं जात आहे, मुंबई विकायला निघालेल्यांनी आम्हाला शिकवू नये, असं म्हणत संजय राऊत यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं.

मुंबई लुटली जाते, मुंबई तोडण्याचं कारस्थान आहे. मुंबईतील मराठी माणसाला हाकललं जाण्याचं कारस्थान केलं जातंय, धारावी त्याचं ज्वलंत उदाहरण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले हे युनेस्कोने वारसा यादीत टाकले, त्यानंतर भाजपकडून सोहळे सुरू आहेत. हे तुम्ही केलं का? भाजपने हे किल्ले बांधले का? असा सवाल राऊतांनी केला. याआधीही महाराष्ट्रातल्या ऐतिहासिक वास्तूंना हा दर्जा मिळला आहे. राजकारणाचा शहाणपणा करू नका अशा शब्दांत राऊंतांनी सरकारवर टीका केली आहे.

संजय शिरसाट यांच्या प्रकरणावरुनही राऊतांनी टीका केली. मी मुख्यमंत्री फडणवीस यांना आवाहन करेन की शिंदे गटातील भ्रष्ट मंत्री संजय राठोड, संदीपान भुमरे १५० कोटी जमीन ड्रायव्हरच्या नावावर, संजय शिरसाट, उदय सामंत अशा मंत्र्यांचे जे घोटाळे समोर आले आहेत, त्यांची एकत्रित एसआयटी स्थापन केली पाहिजे. शिंदे गटाच्या मंत्र्यांची न्यायालयीन चौकशी करावी अशी मागणी संजय राऊत यांनी केली.

# ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम १५ जुलै रोजी

सोलापूर (जिमाका) : जिल्हाधिकारी यांच्या दि.८ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये उत्तर सोलापूर तालुक्यातील सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी महाराष्ट्र ग्राम पंचायत (सरपंच/उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मध्ये सरपंच पदाच्या आरक्षणबाबत तरतुदी निश्चित केल्या आहेत. सदर नियमान्वये नियम २ अ मध्ये नेमून दिल्यानुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, खुला व महिला(अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरीकांचा मागास प्रवर्गाच्या स्त्रीयांसह) सरपंच पदे निश्चित करावयाची आहेत.

त्यानुसार उत्तर सोलापूर तालुक्यातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दि.१५ जुलै २०२५ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता श्री.शिवछत्रपती सभागृह रंगभवन, सोलापूर येथे निश्चित करण्यात आला आहे.

तरी सदर ठिकाणी आपण ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत कार्यक्रमास निश्चित केलेल्या दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे. जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीच्या नोटीस बोर्डावर व चावडीवर तसेच सार्वजनिक ठिकाणी डकवून प्रसिध्द करण्यात येत आहे, अशी माहिती उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील यांनी दिली.

## संपादकीय....

### निधीवरून राजकारण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी महत्त्वाची ठरली आहे. लाडकी बहीण योजनेच्या १२ हप्त्यांची रक्कम लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. जून महिन्याच्या हप्त्याची रक्कम काहीच दिवसांपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागातून यापूर्वी निधी वर्ग करण्यात आल्यानं वाद निर्माण झाला होता. आता महायुती सरकारमधील मंत्री दत्तात्रय भरणे यांनी लाडकी बहीण योजनेमुळं निधी यायला उशीर होतोय, असं म्हटलं आहे. दुसरे मंत्री छगन भुजबळ यांनी देखील दत्तात्रय भरणे यांनी वक्तव्य केलं त्यात लपवण्यासारखं काय आहे, असं म्हटलं. उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी दत्तात्रय भरणे यांच्या अपेक्षा काय आहेत, याची माहिती घेणार असल्याचं म्हटलं. दत्तात्रय भरणे यांनी नुकतेच एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं, मी इंदापूर तालुक्याल सर्व विभागातून जास्त निधी आणण्याचा प्रयत्न करत असतो. आज लाडक्या बहिणीमुळे निधी यायला थोडा उशीर होतोय. थोडा उशीर झाला पण गाडी हळूहळू पूर्ववत यायला लागली आहे. यासंदर्भात बोलताना छगन भुजबळ यांनी यात लपवण्यासारखे काही नाही, स्वाभाविक आहे. घरी अचानक एक मोठा खर्च निघाला तर काय स्थिती होते. लाडकी बहीण योजनेसाठी ४५००० कोटी बाजूला काढायचे आहेत. त्यामुळे इतर गोष्टींना ताण सहन करावा लागेल. सरकारकडे लाडक्या बहिणींसाठी शिल्लक निधी पडलेला नव्हता. जोपर्यंत नीट घडी बसत नाही तोपर्यंत हे होणार आहे.

## वागदरीचा अभिमान–विनय (पप्प्या) नंजुंडेचा कबड्डी क्षेत्रातील यशस्वी प्रवास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावचा सुपुत्र विनय ऊर्फ पप्प्या विलास नंजुंडे हा कबड्डी क्षेत्रातील एक उदयोन्मुख खेळाडू म्हणून अलीकडच्या काळात ठळकपणे पुढे आला आहे. आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्याने गाव, तालुका, जिल्हा पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरावरही आपल्या खेळाची छाप उमटवली आहे.



विनय याने आपली सुरुवात श्री घाळीदास कबड्डी संघामधून केली. गावातील खेळाडूंच्या मार्गदर्शनाखाली आणि आपल्या आई–वडिलांच्या प्रेरणेने त्याने कबड्डीमध्ये विशेष लक्ष घातले. त्याच्या खेळातील चपळाई, डावपेच आणि नेतृत्वगुण यामुळे तो लवकरच सर्वांचे लक्ष वेधून घेऊ लागला.

२३ आणि २४ ऑगस्ट २०२३ रोजी पार पडलेल्या पावसाळी तालुकास्तरीय स्पर्धेत, तो श्री एस.एस. शेळके प्रशाला वागदरीच्या कर्णधारपदी होता. त्याच्या नेतृत्वात संघाने शानदार कामगिरी करत तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या विजयानंतर शेळके प्रशालाची जिल्हास्तरावर निवड झाली आणि संपूर्ण वागदरी गावासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला.

त्यानंतर डिसेंबर २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पार पडलेल्या ५१ व्या ज्युनियर कुमार गट निवड चाचणीत त्याची सोलापूर जिल्ह्याच्या संघात निवड झाली. यामध्येही त्याने चमकदार खेळ करत प्रशिक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

विनयचे पुढचे स्वप्न आहे महाराष्ट्र संघात स्थान मिळवणे आणि प्रो–कबड्डी लीगमध्ये आपले कौशल्य सादर करणे. त्याच्या या यशामागे श्री घाळीदास कबड्डी संघाचे योगदान, संघाचे मार्गदर्शक मंडळ, आई–वडीलांचे आशीर्वाद आणि त्याची स्वतःची प्रचंड मेहनत हे घटक आहेत. विनय नंजुंडे याचा हा यशस्वी प्रवास आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. गावपातळीवरून सुरू झालेला हा प्रवास राज्य आणि देशपातळीवर नेणाऱ्या या प्रतिभावान खेळाडूस पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

# जिवंत हुतात्मा – खा. सदानंदन मास्टर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पूर्ण केरळ राज्य त्यांना आज जिवंत हुतात्मा म्हणून ओळखतं. चष्मा लावलेले, जवळ जवळ सहा फूट उंच, वयाच्या पन्नाशीतही बलदंड शरीरयष्टी टिकवून असलेले सदानंदन मास्टर जेव्हा त्यांच्या विद्यार्थ्यांना इतिहास शिकवण्यात रंगून गेलेले असतात, तेव्हा त्यांच्याकडे बघून वाटतही नाही की त्यांचे दोन्ही पाय गुडघ्यापासून तुटलेले आहेत. गेली वीस वर्षे सदानंदन मास्टरजी कृत्रिम पाय लावून वावरतात, पण त्यांच्या उत्साहात, काम करण्याच्या शक्तीत जराही बदल नाही. त्यांचे विद्यार्थी त्यांना 'मशे' म्हणून ओळखतात. आपल्या ह्या लाडक्या शिक्षकासाठी सदानंदन मास्टर ह्यांचे विद्यार्थी काय वाट्टेल ते करायला तयार आहेत इतके मास्टरजी विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय आहेत.

१९९४ साली जेव्हा सदानंदन मास्टरजीना आपले दोन्ही पाय गमवावे लागले, तेव्हा ते फक्त तीस वर्षांचे होते. त्यांना अपघात झाला नव्हता किंवा कुठला आजारही झाला नव्हता. सदानंद मास्टरजींचे पाय केरळमधल्या कम्युनिस्ट गुंडानी अत्यंत क्रूरपणे करवत वापरून गुढघ्यांपासून कापून टाकले होते, तेसुद्धा भर बाजारात. सदानंदन मास्टरजींचा गुन्हा एकच होता, साम्यवादी विचारांची परंपरा असलेल्या कुटूंबात जन्मूनदेखील त्यांनी राष्ट्रवादी विचारांकडे वळण्याचं धाडस केलं होतं. कम्युनिस्ट वडिलांचा मुलगा संघविचारांनी प्रभावित होऊन स्वयंसेवक झाला होता, तेही केरळच्या कन्नूर जिल्ह्यात, जो जिल्हा केरळमधल्या साम्यवादी हिंसाचाराचा मूळ स्रोत आहे. ह्या जिल्ह्यातली गावंच्या गावं अशी आहेत जिथे फक्त एकाच राजकीय विचारसरणीचा, म्हणजे साम्यवादाचा प्रभाव चालतो. दुसऱ्या कुठल्याही विचारप्रणालीचे वारे जरी इथे फिरकले तरी अत्यंत क्रूर अशी हिंसा वापरून त्या विचारसरणीच्या लोकांचा समूळ बिमोड करण्यात येतो, आणि तरीही, राष्ट्रवादी विचार केरळमध्ये संघाच्या रूपाने रुजतोय, वाढतोय. सदानंद मास्टर हे त्या रुजत्या वाढत्या राष्ट्रवादाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. ही आहे सदानंदन मास्टर ह्यांची कहाणी, त्यांच्याच शब्दात सांगितलेली.

'मी कन्नूर जिल्ह्यामधल्या मट्टनूर जवळच्या एका छोट्या गावात वाढलेला मुलगा. माझे वडील कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. माझा मोठा भाऊ कम्युनिस्ट पक्षाच्या युवा शाखेचं काम करायचा. साहजिकच लहानपणापासून मलाही साम्यवादी विचारांचंच बाळकडू मिळालेलं. त्यात कन्नूर जिल्हा म्हणजे केरळमधल्या साम्यवादाची प्रयोगशाळा. कन्नुरमधल्या पिनरई ह्या गावात पहिल्यांदा केरळमध्ये साम्यवादी विचार रुजला. सध्याचे केरळचे मुख्यमंत्री पिनरई विजयन हे ह्याच गांवचे. त्यांच्यावर राजकीय हिंसाचाराचे आरोपही आहेत. कन्नूरमध्ये दुसऱ्या कुठल्याही विचारसरणीला पाय रोवू द्यायचा नाही हे कम्युनिस्ट पक्षाने ठाम ठरवलेलं. त्यामुळे इथला कुणीही रहिवासी राष्ट्रीय विचारांकडे आकृष्ट होताना दिसला की त्याच्याविरुद्ध, त्याच्या कुटुंबाविरुद्ध पद्धतशीरपणे मोहीम काढली जायची. आधी राजकीय आणि सामाजिक बहिष्कार, मग पदोपदी कामात अडवाअडवी आणि सगळ्यात शेवटी नृशंस हिंसाचार अशी सगळी शस्त्रे वापरून विरोधी विचारांचा बिमोड करणे हे केरळमधल्या कम्युनिस्टांचे धोरणच आहे. तरीही, अश्या भयानक प्रतिकूल परिस्थितीमध्येही कन्नूरमध्ये संघकार्याची स्थापना झाली. साम्यवाद्यांच्या दादागिरीला कंटाळलेले, कम्युनिस्ट विचारांमधला फोलपणा उमजू लागलेले माझ्यासारखे काही तरुण संघविचारांकडे वळायला लागले. सुरवातीला संघ गावा–गावात रुजवण्यासाठी कार्यकर्त्यांनी घेतलेले असीम कष्ट आम्हाला दिसतच होते.



मी कॉलेजमध्ये असताना एसएफआयचं काम करायचो. पण तोपर्यंत मला कळून चुकलेलं होतं की साम्यवादी विचारसरणीत भारताला भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळणे शक्य नाही. ह्याच दरम्यान माझी गावात काम करणाऱ्या काही संघाच्या कार्यकर्त्यांशी ओळख झाली. त्यांची देशकार्याविषयीची तळमळ, भारताला सतावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे इथल्या मातीतच शोधणारी संघाची विचारसरणी ह्याचा माझ्या मनावर नकळतच परिणाम होत गेला आणि मी संघविचारांकडे आकृष्ट झालो. अधून मधून शाखेवर जायला लागलो. माझ्या वडिलांनी मला संघविचारांकडे वाळण्यापासून परावृत्त करायचा प्रयत्न केला खरा, पण त्यात फार जान नव्हती, कारण तोपर्यंत ते स्वतःही कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीला थोडेसे कंटाळले होते, पण माझ्या जीवाला काही धोका होऊ नये म्हणून ते मला अडवत होते. मी संघविचारांकडे वळलेला बघून एसएफआय मध्ये माझ्याबरोबर काम करणारे मित्र मात्र खूप अस्वस्थ झाले. त्यांनी माझं मन वळवायचा खूप प्रयत्न केला, पण कम्युनिस्टांची अरेरावी, त्यांचा हिंसेकडे असलेला कल, कुठलाही विरोधी विचार निर्घृणपणे चिरडून टाकायची त्यांची असहिष्णू वृत्ती ह्यामुळे माझा पुरताच भ्रमनिरास झाला होता. मी स्वतःला पूर्णपणे संघकार्याला वाहून घेतलं.

आमच्या गावात संघ कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन श्रमदानाने एक बस–थांबा उभारला होता. केरळवर राज्य करणाऱ्या कम्युनिस्टांच्या नाकर्तेपणाचा तो बस–थांबा एक प्रतीक होता. जे सरकार करू शकलं नाही ते संघशक्तीने साध्य करून दाखवलं होतं. त्यामुळे तो बस–थांबा कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या डोळ्यात सलत होता. १९९३ मध्ये सप्टेंबरच्या आठ तारखेला कम्युनिस्टांनी कन्नुरमध्ये बंद पुकारला होता. त्या दिवशी काही कम्युनिस्ट गुंडांनी झुंडीने येऊन तो बस–थांबा तोडायला सुरवात केली. आम्हाला खबर कळताच आम्ही संघ कार्यकर्तेही तिथे पोचलो. दोन्ही गटांमध्ये मारामारी झाली. मलाही बेदम मारहाण झाली. आम्ही प्रतिकार केला ते कम्युनिस्टांना आवडलं नाही. आतापर्यंत त्यांना त्यांनी केलेली गुंडगिरी मूकपणे लोक सहन करतात हेच माहिती होतं. मी कम्युनिस्ट विचारांची कास सोडून संघविचारांकडे वळलेलो, त्यामुळे मी त्यांच्या डोळ्यात खूपच सलत होतो. मला जन्मभर लक्षात राहील असा धडा शिकवलाच पाहिजे असं कम्युनिस्टांना वाटत होतं. ती संधी त्यांना लवकरच मिळाली.

मला अजूनही तो दिवस अगदी जसाच्या तसा आठवतो. २५ जानेवारी १९९४ ची संध्याकाळ. मी फक्त तीस वर्षांचा होतो तेव्हा. माझ्या बहिणीचं लग्न काही दिवसांवर आलं होतं. त्या संदर्भात काही बोलणी करायला म्हणून मी माझ्या काकांकडे गेलो होतो. आनंदात होतो मी. माझंही लग्न ठरलं होतं. माझ्याच बी.एड च्या वर्गात शिकणाऱ्या वनिता नावाच्या मुलीबरोबर. आम्ही दोघांनी प्रेमाच्या आणा–भाका घेतल्या होत्या. दोघांचंही शिक्षण संपलं होतं आणि दोघांनी मिळून संसाराची उज्ज्वल स्वप्ने बघितली होती. आपल्यापुढे काय वाढून ठेवलंय याची आम्हा दोघानांही कल्पना नव्हती. माझं काम आटोपून मी बसने रात्री आठ वाजता माझ्या गावात परतलो. माझ्या घर जवळच्या बस–स्टॉप वर मी उतरलो. 'ते' माझी वाटच पहात होते. ते, कम्युनिस्ट पक्षाचे भाडोत्री कार्यकर्ते. माझ्या गावातलेच होते त्यातले काही. मी ओळखतही होतो त्यांना चांगला. त्यांची माझी वैयक्तिक काहीच दुश्मनी नव्हती, पण त्या क्षणी ते द्वेषाने अंध झाले होते. मला घेरून त्यांनी जेरबंद केलं. काहींनी आजूबाजूला गावठी बॉम्ब फेकले. आजूबाजूचे तुरळक लोक घाबरून पळाले. त्या लोकांनी मग मला जमिनीवर पकडून ठेवलं आणि करवतीने माझे दोन्ही पाय गुडघ्यापासून खाली कापून काढले. त्या प्राणांतिक वेदना मी अगदी आजही विसरू शकत नाही. माझे पाय कापून ते कम्युनिस्ट गुंड थांबले नाहीत, त्यानी माझे दोन्ही कापलेले पाय दूर चिखलात फेकून दिले आणि माझ्या रक्ताळलेल्या गुढघ्यांना शेण फासलं. शस्त्रक्रिया करून माझे पाय परत जोडले जाऊ नयेत म्हणून त्यांनी घेतलेली ती खबरदारी होती. त्यांचं काम झाल्यावर मला तसंच तिथे बस–स्टॉपवर रक्ताच्या थारोळ्यात तडफडत सोडून ते निघून गेले. अतिरक्तस्त्रावाने आणि वेदनेने मी इतका क्लांत झालो होतो की मला ओरडण्याचे देखील त्राण राहिले नव्हते. मी तसाच तिथे बेवारशी जनावरासारखा पडून राहिलो, जवळजवळ अर्धा तास, खबर कळून पोलीस तिथे येईपर्यंत.

पोलीस आले तेव्हा मी ग्लानीत होतो. पोलिसांनी आणि इतर संघ कार्यकर्त्यांनी मिळून मला शहरात मोठ्या इस्पितळात नेलं. एकाने दूर फेकलेले माझे पाय बरोबर घेतले. ते परत जोडता येतील म्हणून नव्हे, तर माझे पाय कसे कापून टाकले हे डॉक्टरांना कळावं म्हणून. दुसऱ्या दिवशी मी शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या गुढघ्यांना पांढरंशुभ्र बँडेज बांधलेलं होतं आणि खाली? खाली काहीच नव्हतं. कालपर्यंत मी धडधाकट होतो अन आज दोन्ही पायानी पांगळा झालेलो होतो. त्याच दिवशी वनिता, माझी होणारी पत्नी मला भेटायला इस्पितळात आली. तिचा चेहरा पार विदीर्ण झाला होता. माझ्याजवळ होतं–नव्हतं ते धैर्य एकवटून मी तिला सांगितलं की मी तिला तिच्या वचनातून मोकळं करतोय. तिने माझ्यासारख्या एका पांगळ्याबरोबर आता लग्न करू नये. तिच्या आई–वडिलांनीही तिला हेच सांगितलं. पण ती मानेनेच नाही म्हणून सांगितलं.

मी जवळ जवळ सहा महिने इस्पितळात होतो. खूप कठीण दिवस होते ते. माझं आयुष्य मला निरर्थक वाटत होतं. मी कधीही कुणाचंही वाईट केलेलं नसताना हा भोग माझ्याच वाट्याला का यावा हे मला कळत नव्हतं. नैराश्याने ग्रासलं होतं मला. पण संघाचे कार्यकर्ते नित्य नियमाने माझ्या भेटीला यायचे. मला सतत बोलतं ठेवायचे. माझ्या मनाची उभारी टिकवून ठेवायला मदत करायचे. एकटा असलो की शाखेत शिकवलेली गाणी मी स्वतःशीच गुणगुणत राहायचो. माझे मनोधैर्य वाढवायचा प्रयत्न करायचो. वनिता ह्या सर्व काळात सतत माझ्या बरोबर होती. माझ्या कुटुंबीयांनी, तिच्या कुटुंबीयांनी, इतकंच काय, ज्येष्ठ संघ कार्यकर्त्यांनी सांगून देखील ती माझ्याशी लग्न करण्याच्या तिच्या निश्चयापासून ढळली नव्हती. तिचा दुर्दम्य विश्वास आणि प्रेम, माझ्या कुटुंबीयांनी केलेली सेवा आणि संघाच्या कार्यकर्त्यांनी केलेली अथक साथ, ह्यामुळे मी माझ्या नैराश्यातून बाहेर आलो. डॉक्टरांनी जयपूर फूट बसवला. मी हळूहळू परत चालायची सवय करू लागलो. खूप दुखायचं. पहिल्यांदा कृत्रिम पाय बसवताना कातडी सोलवटायची. प्रत्येक पाऊल उचलताना अपरिमित वेदना व्हायच्या. पण हळूहळू सवय झाली. मी परत माझ्या पायावर उभा राहिलो आणि कुणाच्याही मदतीविना चार पावलं चाललो तो दिवस केवळ माझ्यासाठीच नव्हे तर वनिताला आणि संघातल्या सगळ्यांसाठीच खूप आनंदाचा दिवस होता.

आज जवळ जवळ वीस वर्षे मी कृत्रिम पाय लावून वावरतोय. दिवसाला सलग अठरा–अठरा तास काम करतोय. मिळेल त्या वाहनाने, मिळेल तसा प्रवास करतोय. तासंतास शाळेत उभा राहून शिकवतोय. किंबहुना मला पाय नाहीत ही जाणीवच मी विसरून गेलोय. वनिताचं आणि माझं लग्न झालंय. आम्ही एक छोटं घरकुलही उभारलंय. आम्हाला एक मुलगीही आहे. ती बी. टेक करतेय सध्या. मी अजूनही संघाचं काम करतो. मला वनिताचा आणि माझ्या लेकीचा पूर्ण पाठिंबा आहे. माझ्या कुटुंबातल्या लोकांनाही आता राष्ट्रीय विचारांचं महत्व पुरेपूर उमजलंय. कम्युनिस्ट विचारांमधील फोलपणा आता त्यांना पुरताच कळलाय. इतकंच काय ज्या लोकांनी माझ्यावर हल्ला केला होता त्यातलेही काही लोक आता संघाकडे वळलेत.

ज्यांनी माझे पाय कापले त्यापैकी काही जणांनी नंतर येऊन माझी माफी मागीतली. माझा त्यांच्यावर राग नाही. कारण दोष त्यांचा नाही. ज्या विचारापोटी द्वेषाने आंधळे होऊन त्यांनी माझ्यावर हा भयंकर हल्ला केला त्या विचाराचाच हा दोष आहे. मी आज कोवळ्या मुलांना शिकवतो. त्यांना हा घाऊक द्वेष आंदण देण्याची माझी इच्छा नाही. संघ देशावर प्रेम करायला शिकवतो. एखाद्या व्यक्तीचा किंवा समाजधारेचा द्वेष करायला नाही. मला माझ्या विद्यार्थ्यांना देशप्रेम शिकवायचंय. कुठल्यातरी परकीय देशात उगम पावलेला विदेशी ईझम शिकण्यापेक्षा त्यांनी ह्या देशावर, ह्या मातीवर प्रेम करायला शिकावं. इथल्या प्रश्नांना इथल्या मातीतच उत्तरं शोधायला शिकावं एव्हढीच माझी इच्छा आहे.

पिनरयी विजयन मुख्यमंत्री झालेत तेव्हापासून केरळमध्ये कम्युनिस्टांचा हिंसाचार परत एकवार उफाळून आलाय. ज्या राज्याच्या मुख्यमंत्री स्वतःच एखाद्या राजकीय खुनाच्या प्रकरणात आरोपी असेल त्या राज्यात हिंसा झाली नसती तरच नवल. केरळमध्ये राष्ट्रीय विचारांच्या लोकांपुढे फार मोठी आव्हानं आहेत. एकीकडे रक्तरंजित लाल हिंसाचार तर दुसरीकडे इस्लामी मूलतत्ववाद राज्यात हळूहळू मूळ धरत आहे तर केरळच्या काही भागात ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा अनिर्बंध संचार आहे. तरीही राष्ट्रप्रेमाची ज्योत केरळमध्ये सदैव तेवत राहील कारण ही आदी शंकराचार्यांची जन्मभूमी आहे. संघाचा, राष्ट्रीय विचारांचा प्रभाव केरळमध्ये हळूहळू पण निश्चितपणे वाढतो आहे. मला खात्री आहे की काही वर्षात परिस्थिती जरूर बदलेल.'

**– शेफाली वैद्य**

## शिवाजीराव जाधव दाम्पत्यांनी गुलाब लागवडीचा केला संकल्प

### निसर्गाच्या लहरीपणाचा बसतोय शेतकऱ्यांना फटका

# शेतीमालाला भाव नसल्याने शेतकरी वळले फुलबागेकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव

औसा तालुक्यातील तांबरवाडी येथील शेतकरी शिवाजीराव जाधव यांनी शेतर्यांच्या शेती मालाला योग्य भाव मीळत नसल्यामुळे फुलबाग लागवड करण्याचा निर्नय घेतला व गुलाब लागवड केली. भारत देशाची ओळक ही कृषी प्रधान देश मनुन आपल्या देशाला संबोधल जात पण त्याच शेतकर्यांना अनेक अडचणीचा सामना करुन आपली शेती कसावी लागते .पारंपारीक शेती कसत असताना कधी अल्प पाउस तर कधी ढगफुटी सद्रश पाउस होतो या निसर्गाच्या लहरीपणापुळे शेतकर्यांना आपली शेती कसत असताना अथक परिश्रम घ्याव लागत. या सर्व बाबींचा विचार करुन तांबरवाडी येथील प्रगत शेतकरी शिवाजीराव रावसाहेब जाधव व लताबाई शिवाजी जाधव या दांम्पत्यांनी आपल्या शेतात गुलाब लागवड करून शेतीतुन अर्थीक उत्पन्न काढण्याचा संकल्प केला आहे. त्यांचा हा उपक्रम इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो आहे.



गेल्या काही वर्षांपासून शेती उत्पन्नावर योग्य बाजारभाव न मिळाल्यामुळे अनेक शेतकरी आर्थिक तंगीमध्ये सापडले आहेत. यामुळे पारंपरिक शेतीतून नफा मिळवणे कठीण जाऊ लागले आहे. अशा परिस्थितीत तांबरवाडी येथील शिवाजीराव रावसाहेब जाधव यांनी पारंपरिक शेती सोडून गुलाब लागवड करण्याचा निर्णय घेतला. शेती मालाला भाव न मिळाल्यामुळे आपल्याला पर्यायी उत्पन्न स्रोत शोधावा लागतो. गुलाब लागवडीतून आर्थिक स्थैर्य मिळण्याची शक्यता जास्त आहे, असे शेतकरी शिवाजीराव जाधव यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले.

शेवटी, गुलाब व ईतर फुल सारख्या फुलबागीची बाजारपेठ देखील चांगली असून त्यातून स्थिर उत्पन्न मिळते. यामध्ये शेतकऱ्यांना फुले तोडुन विक्री करणे, सह फुलोत्पादन मिळवण्याचा मार्ग उपलब्ध आहे. त्यामुळे, तांबरवाडीतील शेतकरी शिवाजीराव जाधव यांच्या यशस्वी फुलबागीमुळे इतर शेतकरीही हळूहळू या नव्या शेती प्रकाराकडे वळण्यास सुरुवात करत आहेत.

शेती विकासासाठी पर्यायी मार्गांचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक असल्याचे तज्ज्ञ मत दे. अनेकदा पारंपरिक शेतीतील भयावहतेमुळे शेतकरी कर्जबाजारी होतात किंवा शेती सोडून शहराकडे पलायन करतात. शेतीतून नफा न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी विविध उपयोगी आणि उत्पन्नदायक पिकांच्या लागवडीकडे वळणे सुरू केले आहे. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास मदत होईल, असा विश्वास आहे.शिवाजीराव जाधव यांनी अल्प पाण्यावर योग्य नियोजन करुन ठीबक व रेण पाईप च्या सहाय्याने पाणी देत गुलाब लागवड केला



असुन,यापुर्वीही जाधव यांनी फुलबाग लागवड केली हौती त्यामुळे त्यांना फुलबागेची असलेली माहिती त्यामुळे फुलबाग भरभरुन फुलेल अशी चर्चा शेतकर्यातुन केली जातेय.

## रिपाइं (आठवले) जिल्हा कार्याध्यक्षपदी बाबासाहेब मस्के यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/प्रतिनिधी : जवळगा (मेसाई) ता.तुळजापूर येथिल पँथर चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते तथा रिपाब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे माजी तुळजापूर तालूका अध्यक्ष बाबासाहेब मस्के यांची रिपाइं (आठवले ) च्या धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

नळदुर्ग ता. तुळजापूर येते नुकतच रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश जॉंइट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अध्यक्ष विद्यनंद बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वपुर्ण बैठक संपन्न झाली.या बैठकीत रिपाइंचे जेष्ठ कार्यकर्ते ताथा माजी तुळजापूर तालुका अध्यक्ष बाबासाहेब मस्के यांची रिपाइं(आठवले)च्या धाराशिव जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली असून निवड प्रक्रियेचा भाग म्हणून महाराष्ट्र प्रदेश जॉंइट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ, जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे, मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष आनंद पाडागळे यांच्या सहीनिसी त्यांना सदर निवडीचे पत्र देण्यात आले.

त्यांच्या या निवडीचे सर्वत्र मित्र परिवारा मध्ये आभिनंदन केले जात आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अडचणीतील शेतकऱ्यांना एकरी ५० हजार द्या; आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे सोलर कंपनीस आवाहन

## चपळगाव येथील ज्युनिपर सोलर प्लँटचे लोकार्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : निसर्गाच्या लहरीपणामुळे अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी अडचणीत आले आहेत. परंतु सोलर कंपनीस शेती भाडेतत्त्वावर दिलेल्या अडचणीतील शेतकऱ्यांना एकरी वार्षिक भाडे ५० हजार देण्याची मागणी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केली आहे.

चपळगाव ता.अक्कलकोट येथील ८०० एकर शिवारात उभारलेल्या १५० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता असलेल्या ज्युनिपर सोलर प्लँटचे लोकार्पण आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी त्यांनी ही मागणी केली. यावेळी व्यासपीठावर कंपनीचे लँड मॅनेजर विजय तिवारी, सर्वजीतसिंग, डेप्युटी मॅनेजर चेतन जाधव, प्रोजेक्ट हेड दिपक कटियाल, शैलेंद्र सिंग, अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अप्पासाहेब पाटील, सरपंच वर्षा भंडारकवठे, हन्नुरचे उपसरपंच सागर कल्याणशेट्टी, सरपंच प्रदीप पाटील, माजी सरपंच उमेश पाटील, डॉ. काशिनाथ उटगे, सिध्दराम भंडारकवठे, अभिजीत पाटील, सी.ए. ओंकारेश्वर उटगे, मल्लिनाथ सोनार, राजा कोळी यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

### आणखी १०० मेगावॅटचा प्रकल्प..

**दरम्यान चपळगाव भागात विविध संस्थांनी सोलर प्लँटचे जाळे निर्माण केले आहे.हजारो एकरची शेतजमीन स्थानिकांनी भाडेतत्त्वावर दिली आहे.ज्युनिपरची आणखी १०० मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेण्यात आल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.**

पुढे बोलताना कल्याणशेट्टी म्हणाले की, सौर ऊर्जेमुळे देशाच्या पर्यावरणाला पुरक चालना मिळणार आहे.देशहित लक्षात घेऊन चपळगाव भागातील हजारो शेतकऱ्यांनी शेती भाडेतत्त्वावर दिलेल्या आहेत.यामुळे वाढीव भाडे तसेच भागातील जास्तीत जास्त स्थानिक तरुणांना या ठिकाणी रोजगार मिळावा, ही अपेक्षा आहे.

# आधारिका फाउंडेशन (मुंबई) यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शेरे (शहापूर/ विजय घनघाव : राष्ट्रवादी काँग्रेस चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने आधारिका फाउंडेशन (मुंबई ) यांच्या वतीने जिल्हा परिषद केंद्र शाळा - शेरे (वासिंद-शहापूर) या ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. आणि भविष्यात सुद्धा सदर उपक्रमाकरिता शाळा दत्तक घेणार असल्याचे आश्वासन आधारिका फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात आले आहे.

मुंबई येथील आधारिका फाउंडेशन मुंबई मध्ये अंध मुलांकरिता कामं करीत आहे. दरवर्षी विविध ग्रामीण भागात गरजू विद्यार्थी वर्गाला मदत करणे, इतर सामाजिक कर्तव्य आधारिका फाउंडेशन च्या वतीने पार पाडली जातात.

आज शेरे या गावातील केंद्र शाळेमधील अनेक विद्यार्थी वर्गाला शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

तसेच या शाळेत काम करणाऱ्या गुरुजन वर्गाला सुद्धा भेट वस्तू देण्यात आल्या आहेत.

यावेळी पालक आणि गुरुजन वर्गाने इथे शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती लागू करण्यासाठी प्रयत्न व्हावेत असं मत व्यक्त केले आहे.

### उपक्रमाकरिता शाळा दत्तक घेणार

शालेय साहित्य वाटप मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक अनोखा आनंद दिसून येत होता.

सदर कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस च्या महिला प्रदेश अध्यक्षा सौ. रुपाली ताई चाकणकर यांच्या मार्गदर्शनानुसार, आणि राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे ग्रामीण महिला अध्यक्षा सौ. कल्पनाताई तारमळे यांच्या नेतृत्व अन्वये पार पडला.

यावेळी आधारिका फाउंडेशन (मुंबई) चे विनायक मोरे, संतोष मयेकर, राष्ट्रवादी काँग्रेस शहापूर वैद्यकीय विभागाचे केतन वेखंडे आणि शालेय विद्यार्थ्यांचे पालक मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

# भैरवनाथ कानडे यांना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते उत्कृष्ट निवेदक पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : दलित पँथर संघटनेच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे (दि ९) रोजी संपन्न झालेल्या भव्य व प्रेरणादायी सोहळ्यात तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा येथील सहशिक्षक, निवेदक ,साहित्यिक आणि जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य भैरवनाथ खंडू कानडे यांना निवेदक / सूत्रसंचालन कार्यातील 'उत्कृष्ट निवेदक पँथररत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.



हा गौरव केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री नामदार मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात दलित पँथर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भुजंग नडगम, दलित पँथर महिला आघाडीच्या प्रमुख सुवर्णाताई नडगम, प्रा. विजय बेंगळे, प्रख्यात गायक साजन बेंद्रे, विशाल जाधव, श्री शिवाजी गोरे, डॉ. रोहित बोरकर, प्रकाश धिडले , अनिल रामटेके, हिम्मतराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

भैरवनाथ कानडे यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारिता व साहित्य क्षेत्रातील योगदान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी आजपर्यंत अनेक राष्ट्रीय, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये निवेदक व सूत्रसंचालक म्हणून आपला ठसा उमटवला आहे. त्यांच्या निवेदनशैलीत ओघवता वाणी, संवेदनशीलता, भाषाशुद्धता आणि मंचावरील प्रभावी उपस्थिती या सर्व गुणांचे दर्शन घडते.

त्यांच्या या बहुआयामी योगदानाची आणि सातत्यपूर्ण निवेदन कार्याची दखल घेत त्यांना हा 'पँथररत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

या सन्मानाबद्दल भैरवनाथ कानडे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहेत .

# शिवस्फूर्ती प्रगती मंडळाच्यावतीने शैक्षणिक साहित्यांचे वाटप



घाटकोपर/केतन भोज : सामाजिक,शैक्षणिक,क्रिडा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या घाटकोपर पश्चिम येथील शिवस्फूर्ती प्रगती मंडळ यांच्या वतीने रामनगर नगर (अ ) येथे मंडळाच्या कार्यालयात अध्यक्ष हरेश आण्णा धांद्रुत यांच्या पुढाकाराने तसेच घाटकोपर इन्स्ट्रियल मधील उद्योजक प्रविण तोतरे व प्रकाश पाटील यांच्या सहकार्याने विभागातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख मान्यवर घाटकोपर इन्स्ट्रियल येथील उद्योजक प्रविण तोतरे व प्रकाश पाटील यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच उपस्थित सर्व विद्यार्थांनी ही आपल्यातील कला यावेळी सादर केली.यावेळी या कार्यक्रमाला शिवस्फूर्ती प्रगती मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी देखील उपस्थित होते.

# मुरूमचे माजी नगराध्यक्ष जे.टी.लिमये गुरुजी यांच्या स्मृतीदिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील मुरूम शहराचे माजी नगराध्यक्ष जे.टी.लिमये गुरुजी यांच्या चौथ्या स्मृतीदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि पोषक आहाराचे वाटप करण्यात आले.



उमरगा जनता बँकेचे चेअरमन आणि भाजपचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.मुरूम शहरातील जिल्हा परिषद स्पेशल प्राथमिक शाळेत हा शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम पार पडला.जवळपास १२० विद्यार्थ्यांना या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याते आले.या कार्यक्रमाच अध्यक्षस्थान प्रमोद कुलकर्णी यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून शरण बसवराज पाटील हे उपस्थित होते.

यावेळी स्मृतिशेष जे.टी. लिमये गुरुजी यांच्या आठवणींना विचारपीठावरील उपस्थित मान्यवरांनी उजाळा दिला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक निर्मलकुमार लिमये यांनी केलं तर शरण पाटील,प्रमोद कुलकर्णी,धम्मचारी धम्मभूषण आणि विश्वभूषण लिमये यांनी आपलं मनोगत यावेळी व्यक्त केलं.या कार्यक्रमाचे आभार आनंदकुमार कांबळे यांनी व्यक्ती केलं तर सूत्रसंचालन ख्याडे सरांनी केलं.

या कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे, सी.एल.गोडबोले, किरण गायकवाड, अवेज ढोबळे, अमर भोसले, बाबा शिकलगर, अण्णाराव कांबळे, राहुल गायकवाड, प्रशांत मुरूमकर, राजू मुल्ला उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

### दीड लाखाहून अधिक भाविकांनी घेतले दर्शन

# सद्गुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजांच्या दर्शनासाठी गर्दी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी :

बोलो भारत माता की जय! वंदे मातरम ! हर हर महादेव! गुरू का गुरू महागुरू हवा मल्लिनाथ महाराज की जय! जयचा जयघोष करीत सुमारे दीड लाख भक्तांनी सद्गुरू श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजाची दर्शन घेऊन गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला.

सोलापूर पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील भिगवण आणि स्वामी चिंचोली सरहद्दीवर वसलेले श्रीक्षेत्र भक्तीलिंग मल्लिनाथ महाराज देवस्थानात जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदगुरू श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात गुरुपौर्णिमा यात्रा महोत्सव निमित्त विविध धार्मिक आणि देशभक्ती कार्यक्रम पार पाडला.गुरूवार दि.१० जुलै रोजी पहाटे पाच वाजल्यापासून रात्री उशिरा पर्यंत भक्ताचा राजा सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजाचा सुमारे दीड लाख भाविक दर्शनचा लाभ घेवून जल्लोष साजरी केली.

संसाराच्या व्यापातून थोडाकाळ विश्रांती मिळावा आणि भक्ताने आपले जिवन सार्थक करून शिव भक्तीतून देश भक्ती मार्गाकडे वळावे, या प्रमुख उद्देशाने सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजांनी आंध्रप्रदेश, तेलगण, कर्नाटका, महाराष्ट्रा, गुजरात, राज्यस्थान अशा अनेक राज्यासह संपूर्ण देशभरात सुमारे सहा हजारोहून अधिक शिवलिंग मंदिर आणि जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे शाखा स्थापना केले आहेत. त्या पैकी भिगवण (स्वामी चिंचोली) येथील भक्तीलींग देवस्थान हे सर्वोच्च असून नवसाला पावणारा स्वयं जागृत सर्व धर्मीय श्रद्धास्थान देवस्थान आहे. या यात्रेस देश भरातील सुमारे दीड लाख भाविक भक्त मोठ्या प्रमाणात गर्दी केले होते. यात्रा कमिटीचे वतीने यात्रेची जयत्त तयारी करण्यात आले होते. बुधवार दि.९ जुलै रोजी रात्रौ देशभक्ती गीत भजन भारुड इत्यादी कार्यक्रम झाला असून गुरूवार दि.११ रोजी पहाटे श्री चे महापूजा, महारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम झाला. सकाळी आठ वाजता श्रीचे भव्य पालखी मिरवणूक विविध वाद्य समवेत काढण्यात आला.

### गुरू सेवा पेक्षा देश सेवा सर्व श्रेष्ठ

**गुरू सेवा पेक्षा देश सेवा सर्व श्रेष्ठ आहे.सर्व भक्तांनी अंतकरणातून देश सेवा केला पाहिजे. इतर पूजा आणि सेवा पेक्षा देश सेवा सर्व श्रेष्ठ आहे. देश वाचला तरच आम्ही सर्व जण सुखी राहणार आहोत. देशाचे एकता परंपरा अखंडपणे राखण्यासाठी सर्वांनी देशच माझे घर देशच माझे परिवार असे समजून एकजुटीने राहिले पाहिजे.**

**– सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज**

**राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली.**

# समीर भुजबळ यांनी घेतले श्री विठुमाउलीचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज शनिवार दि.१२/०७/२०२५ रोजी मा. खासदार व कार्याध्यक्ष अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद श्री समीरभाऊ भुजबळ यांनी सहकुटुंब विठ्ठल व माता रूक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

त्यावेळी श्री समीरभाऊ भुजबळ यांचा सत्कार श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने श्री संभाजीराजे शिंदे शिवसेना जिल्हा प्रमुख पंढरपूर विभाग व सदस्य श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा उपरणे देउन करण्यात आला. त्यावेळी समता परिषदेचे कार्यकर्ते व मंदिरे समिती कर्मचारी उपस्थित होते.

# चिखली तालुक्यातील अनेक गावात शेतकरी हुमणी अळीच्या प्रादुर्भावाने संकटात

## मेरा बुद्रुक येथे शेतकऱ्यांनी उभ्या सोयाबीन,उडीद पिकावर फिरवला रोटाव्हेटर






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली आलुक्यातील अनेक गावासह मेरा बुद्रुक व परिसरात येत असलेल्या गावातील शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत असून खरीप हंगाम वाया जाण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

मेरा बुद्रुक येथील अनेक शेतकऱ्यांनी उडीद ,सोयाबीन या पिकावर रोटावेटर वखरे फिरवली आ-हे.१०० हून अधिक एकरातील शेतीमध्ये हुमणी अळीने उडीद,सोयाबीन पिके धोक्यात आल्यामुळे शेतकरी डोक्याला हात लावून बसत आहे.

सततच्या बदलत्या हवामानामुळे, उन्हाळ्यात पडणारा अवकाळी पाऊस यामुळे हुमणी या किडीचा प्रादुर्भाव मागील दोन वर्ष पासून वाढत आहे.परिणामी प्रामुख्याने पीक उत्पादनाम ध्ये मोठ्या प्रमाणात घट आढळून येते. ही कीड पिकांच्या मुळांवर उपजीविका करते.

महाराष्ट्रात प्रामुख्याने सोयाबीन, कापूस,उडीद या पिकांवर मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे.मेरा बुद्रुक,मनुबाई, चंदनपुरसह अनेक गावातील शेतकऱ्यांसमोर हुमणी अळीचे नवीन संकट उभे राहिले असून त्यामुळे शंभर एकरातील शेती धोक्यात आली असल्याचे शेतकरी सांगत आहे.

सध्या हुमणी अळीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने उडीद सोयाबीन पिकावर पायाला मिळत असून हुमणी आणि जमिनीत राहत असून पिकाचे मूळ खात असल्यामुळे झाड सुकली जाऊन ते झाड नष्ट होत आहे.

मेरा बुद्रुक सह परिसरातील शेतात मोठ्या प्रमाणात हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. हुमणी अळी ही जमिनीखाली राहत असल्याने त्यांना नियंत्रण करणे अधिक अवघड झाले आहे.याबाबत कृषी विभागाने मार्गदर्शन करावे अशी मागणी शेतकरी करत आहे.

# स्वा. वीर सावरकर विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कोठुरे येथील मराठा विद्या प्रस-ारक समाजाचे स्वतंत्र्य वीर सावरकर विद्यालयात गुरुपौर्णिमा म्हणजे महर्षी व्यास यांची जयंती (व्यास पौर्णिमा) उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुख्याध्यापक सातप-ुते एस. एल. ,रामदास मोगल (सपत्नीक) समाधान पोटे ,दत्तात्रेय दराडे, स्वाती पिठे ,चित्रा कडलग, मुक्ता कडलग यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. सर्व उपस्थित पालकांचे विद्यार्थ्यांनी पाद्यपुजन केले.

त्यानंतर व्यासपीठावर उप-स्थित असलेल्या सर्व शिक्षक ,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचा पुष्प देऊन विद्यार्थ्यांनी सन्मान केला. गुरुपौर्णिमा निमि त्ताने विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुरुदेवां विषयी आदरभाव व्यक्त केला.

यावेळी दवते आर .आर .सुधाकर निकम, श्रीम. कुटे ए. एन. यांनी मनोगत व्यक्त केले..आषाढ महिन्यातील पहिली पौर्णिमा म्हणजेच महर्षी व्यास जयंती व गुरुपौर्णिमा (व्यास पौर्णिमा) असते.तसेच महाभारत हे महाकाव्य महर्षी व्यास रचित आहे हे सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनामध्ये गुरूचे स्थान किती महत्त्वाचे आहे समजा-वून सांगितले. तसेच गुरु शिष्य नाते कसे असावे हे उदाहरणातून स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु, कोमल कडलग व वैष्णवी कुयटे यांनी कले. कार्यक्रमाचे यशस्वी ते साठी सर्वाचे सहकार्य लाभले.

# स्वेरीच्या गणेश कचरे यांची आय.आय.टी. बॉम्बेमध्ये एम.टेक. साठी आणि भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटरमध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग म धील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या अंतिम वर्षात नुकतेच अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केलेल्या गणेश राजाराम कचरे यांची एम.टेक. च्या उच्च शिक्षणासाठी आय. आय.टी., बॉम्बे येथे निवड झाली आहे तसेच त्यांची भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर मध्ये देखील शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे.

गेट अर्थात 'ग्रॅज्युएट अप्टीट्यूड टेस्ट इन इंजिनिअरिंग' या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेची तयारी 'स्वेरी' मध्ये इंजिनिअरिंगच्या दुसर्या वर्षापासूनच नियमितपणे करून घेतली जाते. विद्यार्थ्यांना या संदर्भात पहिल्या वर्षापासून माहिती दिली जाते तसेच या परीक्षेच्या माध्यमातून मिळणाऱ्या वेगवेगळ्या संधी जसे आय.आय.टी., एन.आय.टी. सारख्या कॉलेजमध्ये एम.टेक. साठी निवड, पब्लिक सेक्टर अंतर्गत असलेल्या वेगवेगळ्या सरकारी कंपन्यांमध्ये निवड आणि इतर संधी बाबत नियमितपणे माहिती दिली जाते व त्यासंदर्भात तयारी करून घेतली जाते. याचाच फायदा घेत गणेश कचरे यांनी इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षात असताना 'गेट' परीक्षा दिली व त्यामध्ये भारतातून ३९वा क्रमांक मिळवला तसेच त्यांनी शेवटच्या वर्षी देखील परीक्षा दिली आणि उत्तम यश मिळवले. या माध्यम ातून त्यांना विविध नामांकित आय.आय. टी. मध्ये उच्च शिक्षणासाठी बोलविण्यात आले. त्यामधून त्यांना आय.आय.टी., बॉम्बे या देशातील नावाजलेल्या संस्थेमध्ये एम.टेक. साठी प्रवेश मिळाला. याचबरोबर त्यांनी भारत सरकारच्या 'भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर'साठी देखील मुलाखत दिली. या प्रक्रियेतून त्यांची या देशपातळीवरील आणि जगविख्यात संस्थेमध्येही निवड झाली. या दोन्ही अप्रतिम संधीच्या माध्यमातून गणेश कचरे यांचे एम.टेक. अर्थात उच्च शिक्षण 'भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर' च्या माध्यम ातून स्पॉन्सर केले जाणार आहे. त्याचबरोबर एम.टेक. संपताच त्यांना या संस्थेबरोबर शास्त्रज्ञ म्हणून काम करण्याची संधी देखील मिळणार आहे. गणेश कचरे यांची कॅम्पस निवड प्रक्रियेमधून नामांकित कंपनीमध्ये देखील निवड झालेली होती. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी विविध कंपन्यांना लागणाऱ्या तयारी बरोबरच इतर संधीची देखील तयारी करून घेतली जाते. ज्यामध्ये गेट, गव्हर्मेंट एक्झाम, कॅट अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध परीक्षांचा समावेश आहे. याचबरोबर विद्यार्थ्यांची ॲप्टीटयूड, सॉफ्ट स्किल, कम्युनिकेशन, ग्रुप डिस्कशन आणि मुलाखत प्रक्रियेसाठी तयारी करून घेतली जाते. या म ाध्यमातून विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील करिअरच्या संधी उपलब्ध होत आहेत. गणेश कचरे यांची आय.आय.टी., बॉम्बे मध्ये निवड झाल्यामुळे संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर तीनही महाविद्यालयाचे प्राचार्य, इंजिनिअरिंग च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालकांनी गणेश कचरे यांचे अभिनंदन केले आहे.

# केळी लागवडीतून प्रयोगशील शेतीकडे वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड प्रतिनिधी/ राजेंद्र थोरात : निफाड तालुक्यातील कोठुरे येथील तरुण शेतकरी सुयोग माधव गिते यांनी पारंपरिक शेतीपद्धतीत बदल घडवत, नव्याने केळी लागवड करून प्रयोगशील शेतीचा एक यशस्वी प्रारंभ केला आहे. कृषी शिक्षण न घेता आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत त्यांनी नवा मार्ग स्वीकारला आहे.या वर्षी प्रथमच केळी लागवडीचा प्रयोग केला असुन मला खात्री आहे अन् आत्मविश्वासही आहे मी त्यात यशस्वी होईल असेही सुयोग गिते यांनी सांगितले आहे.


सुयोग गिते यांनी यंदा सुमारे पाच एकर क्षेत्रावर केळीची लागवड केली आहे काही रोपे जळगाव येथुन आनली आहे तर काही सह्याद्री फार्म येथुन आनली आहे. जी नैन' या प्रकारातील केळीचे रोपे लावली आहेत. एका एकर क्षेत्रामध्ये साधारणतः १७५० रोपाची लागवड करण्यात आली आहे विशेष म्हणजे, त्यांनी या लागवडीसाठी टिश्यू कल्चर तंत्रज्ञान वापरले असून, ठिबक सिंचनाच्या मदतीने पाण्याचा कार्यक्षम वापर केला आहे. त्यांनी शेतीसाठी सेंद्रिय खते आणि जैविक औषधांवर भर दिला आहे, जे पर्यावरणास अनुकूल ठरत आहे.शेतीत काहीतरी नवीन करून दाखवायचं होतं. बाजारपेठेचा अभ्यास करून आणि अन्य यशस्वी शेतकऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन केळी लागवडीचा निर्णय घेतला, असे सुयोग गिते यांनी सांगितले.त्यांच्या या उपक्रमामुळे परिसरातील इतर तरुण शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळत आहे. स्थानिक कृषी विभागानेही त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे. भविष्यात निर्यातक्षम उत्पादन मिळवण्याचे त्यांचे ध्येय असून, त्यासाठी आवश्यक प्रक्रिया आणि बाजारपेठेची तयारी सुरु आहे.

**कोठुरे येथील शेतकरी सुयोग गिते यांचा प्रेरणादायी उपक्रम**

प्रयोगशीलता, कष्ट आणि चिकाटी या त्रिसूत्रीचा अवलंब करून सुयोग गिते यांनी शाश्वत शेतीकडे एक पाऊल टाकले आहे.आत्तापर्यंत गिते यांनी आपल्या शेतीत आले, डाळींब, ऊस, द्राक्षे यास-ारखे जादाचा आर्थिक फायदा करुन देणारे पिके यशस्वी पने लागवड करुन शाश्वत उत्पन्न घेतले आहे. केळी लागवडीसाठी पहील्या वर्षी साधारणतः दोन लाख रुपये एकरी खर्च अपेक्षित आहे नंतर दुसऱ्या वर्षी ठिबक सिंचनसह लागवड खर्च कमी येतो या वर्षाचा पहिला प्रयोग असुन भरघोष उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे मात्र विक्री प्रसंगी बाजारभाव तेजित असने आवश्यक आहे.शेती व्यवसाय जरी जुगार असला तरी आपन जिद्द व चिकाटीने भरघोष उत्पन्न निघेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे शेवटी गिते यांनी सांगितले.

# ॲड. उज्वल निकम यांना खासदारकीची लॉटरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : ज्येष्ठ सरकारी वकील अँड उज्वल निकम यांची राष्ट्रपती नाम निर्देशित खासदार म्हणून निवड करण्यात आलेले आहे. राष्ट्रपतींच्या कोट्यातून ही निवड करण्यात आली आहे. निकम यांच्याबरोबरच हर्षवर्धन शृंगाला, डॉ. मीनाक्षी जैन, सी सदानंद मास्टर, यांची ही राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून निवड करण्यात आली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाकडून आदेश सूचना करण्यात आ-लेली आहे. हर्षवर्धन शिंगाला हे माझी परराष्ट्रीय सचिव आहेत. सदानंद मास्टर ही केरळ मधील समाजसेवक व शिक्षण तज्ञ आ-हेत. मीनाक्षी जैन ह्या प्रसिद्ध इतिहासकार आहेत व त्यांनी इतिहास लोकांसमोर आणण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. या सर्वांची राष्ट्रपती कोट्यातून खासदारकीची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातून ज्येष्ठ वकील उमल निकम यांची निवड करण्यात आली आहे. १९९३ म धील बॉम्बस्फोट खटला खटल्यास अनेक महत्त्वाच्या केसेसमध्ये सरकारी वकील म्हणून काम केलेले आहे.

प्रसिद्ध गायक गुलशन कुमार हत्याकांड, भाजप नेते प्रम ोद महाजन हत्याकांड, प्रकरण २००८ मध्ये मुंबई दहशतवादी हल्ला, कोपर्डी प्रकरण यासारख्या राज्यात गाजलेल्या प्रकरणात निकम यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले आहे. सध्या बीड मधील मस जॉगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड चर्चे त आहे या प्रकरणातही निकम हे सरकारी वकील म्हणून काम पाहत आहेत. दरम्यान नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत उज्वल निकम यांनी भाजपच्या तिकिटावर नशीब आजमावले होते. निवडणुकीआधी त्यांनी भाजपमध्ये प्रवेशही केला होता. मात्र या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. काँग्रेस चे उमेदवार वर्षा गायकवाड यांनी त्यांचा पराभव केला होता.

## निफाड मोरे महाविद्यालयात बौद्धिक अधिकार संपदा कार्यशाळा

## डॉ.प्रशांत कोळी यांचे प्रतिपादन

# संशोधनाच्या संरक्षणासाठी बौद्धिक संपदा अधिकार आवश्यक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या आणि माहितीच्या युगात नवकल्पना आणि वेगळं पण सिद्ध करणारे संशोधन हे वैज्ञानिक भारताच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीचे मुख्य स्त्रोत आहे. नवकल्पनांची आणि संशोधनाची योग्यरीत्या नोंद व संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा अधिकार आवश्यक असल्याचे मत डॉ. प्रशांत कोळी यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक सम ाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात बौद्धिक संपदा अधिकार या विषयावर शनिवार दि.१२ जुलै रोजी एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे, प्रा. डॉ. विक्रम जाधव, प्रा भगवान कडलग प्रा मोहाड,प्रा डॉ सुसान लॉरेन्सिया प्रा योगेश कडलग प्रा आर एस मोहोड प्रा भाऊराव मुंतोंडे आदी उपस्थित होते.

प्रा डॉ. प्रशांत कोळी पुढे म्हणाले की, औद्योगिक क्रांतीनंतर संशोधनाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे परंतु नवकल्पनांच्या साह्याने निर्माण केलेल्या कलाकृती, संशोधन , डिझाईन, सॉफ्टवेअर इत्यादीचे संरक्षण करण्याची गरज भासू लागली म्हणून बौद्धिक संपदा अधिकार निर्माण त्यामुळे पेटंट कॉपीराईट ट्रेडमार्क आदीमुळे संशोधनाचे संरक्षण झाले. यासाठी संशोधकांनी आपल्या नवकल्पनांची नोंदणी बौद्धिक संपदा अधिकार कायद्या अंतर्गत करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले



या कार्यशाळेत डॉ. विक्रम जाधव प्रा. भगवान कडलग यांनी देखील म ार्गदर्शन केले. डॉ.विक्रम जाधव यांनी बौद्धिक संपदा अधिकाराचे महत्त्व विशद केले.

प्रा. भगवान कडलग यांनी देशातील अनेक विद्यापीठे आता बौद्धिक संपदा अधिकार या विषयक अभ्यासक्रम तयार करीत आहे हा अभ्यासक्रम नव संशोधकांना प्रोत्साहन ठरवू पाहत आहे. याविषयीची माहिती दिली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे हे होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी ग्रामीण भागातील संशोधकांमध्ये संशोधनाचा खजिना आहे ,त्यांच्या संशोधन कृतीला योग्य चालना दिल्यास दर्जेदार संशोधन निम ार्ण होईल. बौद्धिक संपदा सर्जनशीलता आणि नावीन्यतेला प्रोत्साहन देते. त्यामुळे संशोधक, कलाकार, उद्य-ोजक आणि तंत्रज्ञ आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणून समाजाला काहीतरी नवे देऊ शकतात. विद्यार्थ्यांनी आणि नव संशोधकांनी आपल्या नवकल्पना मर्यादित न ठेवता त्याची नोंदणी करून आपल्या नवकल्पनांना संरक्षण करून देण्याची गरज प्राचार्यांनी विशद केली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती आर.एस. मोहोड यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती चैताली कापसे यांनी केले.